# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.07.2024** **वारःबुधवार**

---

1. भारत आणि रशिया दरम्यान 2030 पर्यंत व्यापार 100 अब्ज डॉलर्सवर नेण्याचं उद्दिष्ट, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा, रशियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्कारानं सन्मान
2. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विनियोजन विधेयक मंजूर, 94 हजार 889 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर
3. राजकीय पक्षांनी आरक्षणाबाबत आपली भूमिका लेखी कळवावी-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं आवाहन
4. गौतम गंभीर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड आणि
5. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 20षटकांच्या तिसऱ्या सामन्यात भारतीय महिला संघाचा दणदणीत विजय, मालिकेत बरोबरी

**<u>पंतप्रधान</u>**

भारत आणि रशियानं 2030 पर्यंत व्यापार 100 अब्ज डॉलर्सवर नेण्याचं उद्दिष्ट निश्चित केलं आहे. विविध क्षेत्रांमधील सहकार्यासाठी नऊ करार देखील उभय देशांनी केले आहेत. यामध्ये हवामान बदल, नकाशाशास्त्र, ध्रुवीय संशोधन, गुंतवणूक, व्यापार आणि औषध निर्मिती, तसंच प्रसार भारती आणि टीवी नोवोस्ती दरम्यान सहकार्य कराराचा समावेश आहे.

तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत - रशिया शिखर परिषदेत रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. आगामी काळात भारत- रशिया संबंध आणखी दृढ होतील, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. रशियातील सर्वोच्च “ऑर्डर ऑफ सेंट अँड्र्यूज द एपोस्टल” या नागरी पुरस्कारानं पंतप्रधान मोदी यांना सन्मानित करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मॉस्कोमध्ये भारतीय समुदायाशीही संवाद साधला. तिसऱ्या कार्यकाळात तिप्पट वेगानं काम करून भारतीय अर्थव्यवस्थेला जगात तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. रशियाच्या यशस्वी दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी काल ऑस्ट्रियाच्या दौऱ्यावर विएन्ना इथं पोहोचले. चान्सलर कॉर्ल नेहमर यांनी मोदी यांच्या सन्मानार्थ भोजनाचं आयोजन केलं. आज ते ऑस्ट्रीयाचे अध्यक्ष एलेकझँडेर वान डेर बेलन यांच्यासोबत चर्चा करतील. भारतीय पंतप्रधानांद्वारे 41 वर्षांनंतर ही पहिलीच भेट आहे.

**<u>विनियोजन</u>**

विधानसभेत काल विनियोजन विधेयकाला मंजुरी देण्यात आली. तत्पुर्वी, महसूल, वने, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य तसंच महिला बालविकास विभागाच्या मागण्या विधानसभेनं मंजूर केल्या. त्यानंतर उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विनियोजन विधेयक मांडलं. त्यावर बोलताना, दोन वेळा अर्थसंकल्प सादर करण्याची गरज नसल्याचं मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केलं. याला सहमती दर्शवताना अजित पवार म्हणाले की यासाठी स्थापन करण्यात आलेली समिती अस्तित्वात आली नाही, ती लवकर स्थापन करून हा प्रकार बंद व्हावा असं पवार यांनी स्पष्ट केलं. विनियोजन विधेयक काल विधानपरिषदेतही मंजूर करण्यात आलं. विधानपरिषदेत अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेला मंत्री दीपक केसरकर यांनी उत्तर दिलं. या अतिरिक्त अर्थसंकल्पात प्रत्येक विभागासाठी भरीव आणि पुरेशी तरतूद केली आहे, त्यामुळे अर्थसंकल्पातल्या योजना राबवण्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

**<u>पुरवणी</u>**

विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर लगेचच; विक्रमी 94 हजार 889 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केल्या. त्यात सर्वाधित 25 हजार कोटी रुपयांची तरतूद, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आलेली आहे. त्याखालोखाल नगर विकास विभागासाठी 14 हजार 595 कोटी, कृषी विभागासाठी 10 हजार 724 कोटी रुपये तर मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना आणि नमो महारोजगार मेळाव्यांसाठी 5 हजार 55 कोटी रुपयांहून अधिक तरतुदींचा यात समावेश आहे.

आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन; जनतेची फसवणूक करण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात पुरवणी मागण्या सरकारनं मांडल्या आहेत, अशी टीका माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केली. यामुळे राज्याची महसुली तूट एक लाख 14 हजार कोटींपेक्षा अधिक तर राजकोषीय तूट चार टक्क्यांपेक्षा जास्त होईल अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. त्यावर राज्याची आर्थिक शिस्त बिघडू नये याची खबरदारी घेऊन पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. विरोधकांनी राज्यात येणाऱ्या गुंतवणुकीत अडथळे निर्माण होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी असं उत्तर पवार यांनी दिलं. विधानपरिषदेत दिपक केसरकर यांनी पुरवणी मागण्या सादर केल्या.

**<u>विधिमंडळ कामकाज</u>**

मुंबईतल्या रेल्वेमार्गांवरच्या विविध स्थानकांची नावं बदलण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा प्रस्ताव विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी काल एकमतानं मंजूर केला. विधानपरिषदेच्या दोन नवनिर्वाचित आमदारांना काल सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. मुंबई पदवीधर मतदारसंघाचे आमदार अनिल परब आणि नाशिक शिक्षक मतदारसंघाचे आमदार किशोर दराडे यांना उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी शपथ दिली.

राज्यात नवी महसूल कार्यालय निर्मिती आणि महसूल विभागातल्या अन्य विषयांबाबत सेवानिवृत्त सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल 25 जुलैला येणार असून त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल अशी माहिती महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल विधानपरिषदेत दिली.

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या पुनर्रचनेच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आल्याची माहिती राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात दिली. राज्यात हजारो कोटींचा रुग्णवाहिका घोटाळा झाला असून त्यासाठी काढलेली 10 हजार कोटींची निविदा रद्द करावी, तसंच विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.

**<u>सर्वपक्षीय बैठक</u>**

पुरोगामी महाराष्ट्राची परंपरा अबाधित राखतानाच राज्य शासन कुठल्याही समाज घटकावर अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिली. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजात तेढ निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आरक्षणाबाबत राजकीय पक्षांनी आपली लेखी भूमिका आणि अभिप्राय शासनाला कळवावेत, असं आवाहनही त्यांनी केलं. आरक्षणाबाबत मुंबईत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, ज्येष्ठ नेते प्रकाश आंबेडकर, यांच्यासह विविध मंत्री आणि नेते यावेळी उपस्थित होते. या बैठकीवर विरोधकांनी आयत्या वेळी बहिष्कार टाकल्याबद्दल फडणवीस यांनी टिका केली आणि आरक्षणाबाबत विरोधक गंभीर नाहीत हेच यातून स्पष्ट होतं असं नंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>नक्षलवादी अटक-गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यातल्या दोन नक्षलवाद्यांना भामरागड तालुक्यातल्या धोडराज परिसरातून पोलिसांनी अटक केली. रवी मुल्ला पल्लो आणि दोबा कोरके वड्डे अशी या दोघांची नावे आहेत. या दोघांवरही 10 लाख रुपयांचे बक्षीस होतं. अहेरीतल्या

प्राणहिता पोलिस उपमुख्यालयातील सी-60 पथकाच्या जवानांकडून धोडराज परिसरात नक्षलविरोधी अभियान सुरू होतं त्यावेळी रवी आणि दोबा यांना संशयास्पद स्थितीत फिरताना अटक केली.

**नीट-लातूर**

नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणातील तिसरा संशयित गंगाधर याला सीबीआयनं आंध्र प्रदेशातून अटक केली आहे. त्याला काल लातूरच्या न्यायालयापुढं हजर केलं असता न्यायालयाने त्याला 11 जुलैपर्यंत सीबीआय कोठडी सुनावली.

**गौतम गंभीर**

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून, माजी क्रिकेटपटू गौतम गंभीर यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शहा यांनी समाजमाध्यमावरील संदेशाद्वारे काल ही घोषणा केली. भारतानं टी-20 विश्वचषक जिंकल्यानंतर मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी आपली निवृत्ती जाहीर केली होती; त्यांच्या जागी आता गौतम गंभीर यांची निवड झाली आहे.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, तिसऱ्या आणि शेवटच्या T20 सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा 10 गडी राखून पराभव करत आजवरचा सर्वात मोठा विजय नोंदवला. भारतानं 85 धावांचं आव्हान अकराव्या षटकांतच पूर्ण केलं. या विजयामुळं भारताने मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली. दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला होता. वेगवान गोलंदाज पूजा वस्त्रकारनं 13 चेंडूत चार गडी बाद केले, तिला सामनावीर घोषित करण्यात आलं. तसंच या मालिकेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल ती मालिकावीरही ठरली. दक्षिण आफ्रिकेने 17 षटकं 1 चेंडूत 84 धावा केल्या. सलामीवीर स्मृती मनधनानं 40 चेंडूत 54 आणि शफाली वर्माने 25 चेंडूत 27 धावा करुन भारताला विजय मिळवून दिला.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट प्रदेशांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात वीजांसह हाच इशारा देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.